REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाविवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १९ जुलै, १९४४ अंक २९

Telephone 779

GUEST HOUSE

TELEGRAM
Guest House
Poona 2.

## जाहीर प्रकटन.

कळविण्यास आनंद वाटतो कीं, दि. २५ मे १९४४ रोजीं बंद करण्यांत आलेलें आमचें जेवणाचें खातें दि. २५ जुलै १९४४ पासून नेहमींप्रमाणें नवीन व्यवस्थेखालीं सुरू करण्यांत येणार आहे. तरी आमच्या पूर्वीच्या आश्रयदात्यांस अशी विनंति आहे कीं, त्यांनीं आपापल्या शिधापत्रिका पूर्वीप्रमाणेंच पूना गेस्ट हाऊसच्या नांवावर बदलून घेण्यासाठीं आमचेकडे दि. २० जुलैचे आंत आणून द्याव्यात. मध्यंतरीच्या काळांत आमच्या आश्रयदात्यांची जी गैरसोय झाली त्याबद्दल आम्ही अत्यंत दिलगीर आहोंत.

पूना गेस्ट हाऊस.
गणपति चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.

( Approved Re-traders and Approved Contractors )
२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स
★ रीमोल्ड [illegible] ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. ग. मराठे
मॅनेजिंग डायरेक्टर.

# WANTED

Agents to represent Sun Life Assurance Co. Of Canada in Ahmednagar, Jalgaon, Kolhapur, Nasik & Sholapur. Excellent opportunities for capable and successful men. Full training will be given.

Apply to:—

Mr. P. V. Lad,

Unit Organizer.

Sun Life Of Canada, Laxmi Rd., POONA 2.

JUST PUBLISHED

**INDIAN RURAL PROBLEM**

BY

Sir Manilal Nanavati and Prof. J. J. Anjaria.

(Issued by the Indian Society of Agricultural Economics, Bombay).

Price Rs. 8

(Postage extra).

*Sole Selling Agents:—*

THE CO-OPERATORS' BOOK DEPOT.

9, BAKEHOUSE LANE,
FORT, BOMBAY.


## विविध माहिती

### पंजाबमध्यें गव्हाच्या उत्पादनांत घट

पंजाबमध्यें गव्हाच्या लागवडींत ५% घट असून उत्पादनांत १४% घट अपेक्षित आहे.

### महाराष्ट्र चेंबरचा कायमनिधि

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबईनें कायमनिधि जमविण्यास प्रारंभ केला आहे, त्याचा उद्देश चेंबरसाठी स्वतःची इमारत उभारून स्थैर्य आणणें व चेंबरची उपयुक्तता वाढविणें, असा आहे. ६ जुलै अखेर ह्या निधीस ७७½ हजार रुपयांच्या देणग्या मिळाल्या आहेत.

### बँक ऑफ नागपूर लि., वर्धा

वरील बँकेचें नांव आतां शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल करण्यांत आलें आहे.

### रहाणीचा वाढता खर्च

हिंदुस्थानांतील शहरांतून रहाणीच्या खर्चाचें मान वाढलें आहे, तें गरीब वर्गाच्या दुःस्थितीचें लक्षण नसून शहरी लोकांच्या चलतीचें तें लक्षण आहे, असें सरकारी कॉमर्स खात्याच्या अधिकाऱ्यानें नुकतेंच सांगितलें.

### मध्यवर्ती सरकारचीं कर्जें

एप्रिल ते जुलै, १९४४ या मुदतींत हिंदुस्थान सरकारच्या कर्जांत लोकांनीं ३७ कोटि रुपये गुंतविले. त्यापैकीं १५½ कोटि रुपये ३% व्हिक्टरी लोन (१९५७) च्या वाटणीस आले व २१½ कोटि रुपये इतर कर्जांचे वाट्यास आले.

### नियंत्रित दरानें छत्र्यांची विक्री

कांहीं निवडक दुकानांत १½ लक्ष छत्र्या नियंत्रित किंमतीस विक्रीस ठेवण्याचें बंगाल सरकारनें ठरविलें आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या रिपोर्टाच्या प्रति

रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती मंडळाच्या अहवालाची प्रत प्रत्येक भागीदारास देणें चालू वर्षीं कागद नियंत्रणामुळें शक्य होणार नाहीं. थोड्याशाच प्रती छापण्यांत येतील व प्रतीची मागणी करणारासच प्रती संपेपर्यंत त्या देण्यांत येतील. हिशेबाचे तक्ते मात्र सर्वांस मिळतील.

### पुणें येथील सहकारी शाळेचें उद्घाटन

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटतर्फे पुणें येथें स्थापन झालेल्या सहकारी शाळेचें उद्घाटन सोमवार ता. १७ जुलै रोजीं पुणें सें. को. बँकेच्या दिवाणखान्यांत प्रो. वा. गो. काळे ह्यांचे हस्तें झालें. प्रारंभीं शाळेचे ऑनररी प्रिन्सिपाल, श्री. श्री. रा. पाळंदे, ह्यांनीं शाळेसंबंधीं माहिती सांगितल्यावर समयोचित भाषण करून प्रो. काळे ह्यांनीं उद्घाटन जाहीर केलें. रावसाहेब वाय. डी. खोले ह्यांनीं आभार मानल्यावर समारंभ संपला.

### अमेरिकेची सैनिक हानी—ताजे आंकडे

युद्धास प्रारंभ झाल्यापासून आतांपर्यंत अमेरिकेचे २,३५,४११ सैनिक कामास आले आहेत. त्यांत ५३,६०२ मृत, ९१,५७३ जखमी, ४७,५७५ बेपत्ता व ४२,६५८ युद्धकैदी ह्यांचा समावेश होतो.

### कलकत्ता शहरांतील ट्रामवे

कलकत्ता ट्रामवे कं. लि. विकत घेतल्यानंतर शहरांत ट्रामवे चालविण्यासाठी कलकत्ता कॉर्पोरेशननें सरकारची परवानगी मागितली आहे. ट्रामवे ह्या रेल्वेच्या व्याख्येंत येतात, ह्यासाठीं रेल्वे बोर्डाच्या परवानगीची आवश्यकता आहे.

### अमेरिकन सैनिकांसाठी खास इस्पितळ

पश्चिम आघाडीवर जखमी झालेल्या अमेरिकन सैनिकांसाठी एक स्वतंत्र, संपूर्ण अमेरिकन इस्पितळ इंग्लंडमध्यें २५ लक्ष रुपये खर्चून उघडण्यांत आलें आहे. जखमी सैनिकांना रणक्षेत्रावरून विमानांतून ह्या इस्पितळांत परस्पर पोंचविण्यांत येतें.

### ब्रिटिश मोटारींची निर्गत व डाव्या हाताची वहातुक

रस्त्यानें नेहमीं डाव्या बाजूनें वहानें हाकण्याची पद्धत ग्रेट ब्रिटन, चीन, जपान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, मलाया, डच ईस्ट इंडीज, वगैरे देशांत आहेत. अमेरिका, कानडा व युरोपांतील बहुतेक देश ह्यांत रस्त्याच्या उजव्या बाजूनें वहानें चालविलीं जातात. जगांतील सर्व देशांमध्यें ह्यासंबंधांत एकवाक्यता झाली तर मोटारींच्या उत्पादनास व निर्गत व्यापारास तें सोईचें होणार आहे. ह्या दृष्टीनें, ग्रेट ब्रिटन त्याच्या सोईच्या दृष्टीनें डाव्या हाताच्या वहातुकीचें समर्थन करील, कारण तो जेथें मोटारी निर्गत करूं शकेल तेथें डाव्या हातानेंच वहातूक चालू आहे. युरोप कांहीं वर्षे तरी ब्रिटिश मोटारी घेऊं शकणार नाहीं. हिंदुस्थान व चीन येथील खपावरच त्याचा डोळा आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | २२६ | सत्यस्वरूप—सोनारानें कान टोचले. | |
| २ अन्न-वस्त्राचा पुरवठा... | २२७ | ५ आजचा जपान ... | २३१ |
| ३ १९४३ चें विमा वार्षिक | २२८ | ६ बँक ऑफ इंडिया लि. | २३१ |
| ४ स्फुट विचार .. ... संरक्षक व संवर्धक अन्नाचें महत्त्व—हिंदी अन्नाची सत्व-हीनता—स्टर्लिंग शिलकाचें | २२९ | ७ लिमिटेड कंपनीचा दिवाळ-खोर डायरेक्टर ... | २३१ |

अर्थ

बुधवार, ता. १९ जुलै, १९४४

## अन्न-वस्त्राचा पुरवठा

मनुष्याच्या जीवनांत अन्न आणि वस्त्र ह्या दोन वस्तूंस विशेष महत्त्व नैसर्गिक रीतीनेंच आहे. युद्ध चालू असतांना ह्या वस्तूंचा पुरवठा, वाटणी व किंमती ह्यांचेसंबंधांत नेहमीचा सुरळीतपणा रहात नाहीं आणि मामुली देवघेवीच्या पद्धतीनें आवश्यक तो कार्यभाग समाधानकारकपणानें होत नाहीं. ह्या कारणानें सैन्याच्या अन्नवस्त्राविषयींच्या गरजा भागवून सामान्य जनतेचें रोजचें जीवन शक्य तितक्या व्यवस्थेनें चालेल अशा बेतानें सरकारास धान्य, कापड, इत्यादींचा देशांत नीट पुरवठा व वाटणी करण्याची जबाबदारी स्वतःच्या अंगावर घ्यावी लागते. गेल्या वर्षी बंगालमध्यें लोकांवर आलेल्या दुष्काळाच्या आपत्तीमुळें ह्या प्रश्नाची विस्तृत चर्चा झाली आहे आणि होत आहे. शहरवासी आणि खेडेगावी जनतेस जरूरी इतकें अन्न मिळेल अशी तरतूद सरकारनें करावी आणि बंगालच्या दुष्काळाची पुनरावृत्ति त्या प्रांतांत व इतरत्र हिंदुस्थानांत होऊं नये ह्याविषयीं त्यानें खबरदारी घ्यावी अशी मागणी होत आहे त्याचें कारण उघड आहे. धान्याचें उत्पादन हरतऱ्हेनें वाढवण्याची प्रांतिक सरकारांची खटपट चालली आहे ती यशस्वी होण्यास शेतकऱ्यांस जरूर असलेलीं बीं-बियाणें, खतें व बैल ह्यांचा पुरवठा वेळींच केला जाणें आवश्यक आहे. तसेंच, धान्य जमा करणें आणि त्याची प्रमाणबद्ध वांटणी करणें ह्यांचे बाबतींत आतांपर्यंत आलेल्या अनुभवापासून बोध घेतला जाऊन त्यासंबंधांत योग्य त्या सुधारणा व्हाव्या अशा सूचना करण्यांत आल्या आहेत त्यांकडे लक्ष पुरवलें गेलें पाहिजे. बंगालमधील दुष्काळाचीं कारणें शोधून काढून तीं नाहींशीं होण्यास कोणते उपाय योजणें आवश्यक आहे ह्या बाबतींत शिफारसी करण्यासाठी एक कमिशन नेमण्यांत आलें आहे. ह्या चौकशीच्या क्षेत्रांत अन्नपुरवठ्याच्या व्यवस्थेचे सर्व प्रश्न अंतर्भूत व्हावे अशाबद्दल कॉमन्स सभेंत प्रश्नोत्तरें झालीं असून मि. एमरी ह्यांनीं आश्वासनात्मक विधानें केलीं आहेत.

धान्याचें उत्पादन वाढवण्याची ह्या देशांत शिकस्त झाली तरी बाहेरून धान्याचा पुरवठा ग्रेगरी समितीच्या सूचनेस अनुसरून न झाल्यास अन्नाची टंचाई भासण्याचा संभव आहे अशा आशयाचें एक पत्रक कित्येक वजनदार हिंदी पुढाऱ्यांनीं प्रसिद्ध केलें होतें, त्याचाहि प्रतिध्वनि कॉमन्स सभेंतील प्रश्नोत्तरांत उठला आहे. दहा लक्ष टन इतकें तरी धान्य ह्या देशांत आयात झालें पाहिजे. ह्यापैकीं येत्या ऑक्टोबर अखेर आठ लक्ष टन धान्य इकडे येईल असें उत्तर मि. एमरी ह्यांनीं दिलें आहे आणि ह्या प्रश्नाचा विचार पुन्हां ऑगस्ट व नोव्हेंबर ह्या महिन्यांत केला जाईल असें म्हटलें आहे. समुद्रावरील वहातुकीची अडचण त्यांनीं पुन्हां पुढें मांडली आहे आणि ब्रिटिश सरकार अवघड परिस्थितींतहि हिंदुस्थानास धान्य पुरवण्याचा प्रयत्न करीत असल्याचें आश्वासन दिलें आहे. हिंदी जनतेचीं मनें धान्यपुरवठ्याचे संबंधांत स्वस्थ रहातील असा प्रचार केला जावा असेंहि त्यांनीं सुचवलें आहे, तें ठीक आहे. परंतु हिंदुस्थानांत अन्नतुटवडा पडूं नये ह्यासाठी ग्रेगरी समितीनें केलेल्या शिफारसींची अंमलबजावणी होण्याचें महत्त्व हिंदी पुढाऱ्यांनीं प्रतिपादलें असून सरकारनें वेळींच सावध रहावें असें त्यास बजावलें आहे त्याचा समाधानकारक निकाल मि. एमरी ह्यांच्या उत्तरानें झालेला नाहीं. कॉमन्स सभेंतील प्रश्नांवरूनहि ही गोष्ट उघड होत आहे. देशामध्यें धान्य-निर्मिति भरपूर होऊन अन्नटंचाई जनतेस भासूं नये, अशीच सर्वांची इच्छा आहे, तथापि, सावधगिरीचें धोरण फाजील आशावादापेक्षा केव्हांहि अधिक इष्ट आहे हें विसरतां कामा नये.

वस्त्रनियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं कापडाचें उत्पादन, पुरवठा व किंमती ह्यांचेविषयीं माहिती नुकतीच दिली ती बरीच आशादायक आहे असें म्हटलें पाहिजे. नियंत्रणापूर्वी कापडाचे भाव भरमसाट चढले होते, त्यांत आतां साठ टक्के घट झाली आहे हा त्यांचा पहिला मुद्दा होता. गिरणीवाल्यांनीं स्वतःच प्रयत्न करून क्रमाक्रमानें कापड स्वस्त केलें आणि सरकारच्या सक्तीनें हा परिणाम घडवून आणलेला नाहीं, ह्या गोष्टीवर त्यांनीं अभिमानपूर्वक जोर दिला. किंमतींत घट झाली तरी कापडाचें उत्पादन विशेष वाढलेलें नाहीं, ह्या कित्येक टीकाकारांकडून घेण्यांत येणाऱ्या आक्षेपास उत्तर म्हणून श्री. कृष्णराज ह्यांनीं कांहीं आकडे पुढें मांडले आहेत. कोळशाचा तुटवडा आणि कुशल कारागिरांची वाण ह्यामुळें गिरण्यांच्या कांहीं केंद्रांत कापडाचें उत्पादन मर्यादित झालें आहे ही गोष्ट खरी असली तरी युद्धापूर्वी हिंदी गिरण्यांत ३५० कोटि वार कापड तयार होत होतें, तें गेल्या वर्षी ४८० कोटि वारांपर्यंत वाढलें. हातमागाचें उत्पादन २०० कोटि वार ह्यांत मिळवलें तर एकूण पुरवठा ६८० कोटि वार होतो. ह्यापैकीं निर्गत व लष्करी मागणी ह्यांकरितां लागणारे १२० कोटि वार वजा केले असतां ५६० कोटि बाकी राहतात. हें लक्षांत घेतलें असतां कापडाच्या उत्पादनाचे संबंधांत घेण्यांत येणारा आक्षेप फोल असल्याचें दिसून येईल असें कृष्णराज ह्यांनीं म्हटलें आहे. चोरबाजाराचें नियंत्रण कडक आणि यशस्वी रीतीनें अंमलांत आणल्याबद्दल त्यांनीं मुंबई सरकार आणि प्रांतिक नियंत्रण अधिकारी ह्यांचें अभिनंदन केलें पण त्याचबरोबर कित्येक प्रांत आणि संस्थानें ह्यांमध्यें सदरहु बाबतींत ढिलाई असल्यामुळें कापड भरमसाट भावानें खरेदी होऊन विकण्यांत येतें ह्याविषयीं खेद व्यक्त केला. बाहेरचे व्यापारी वाटेल त्या किंमती देऊन कापड विकत घेऊन भरमसाट नफा मिळवीत आहेत ह्या कारणानें मुंबईसारख्या ठिकाणींहि चोर बाजारास उत्तेजन मिळतें अशी

श्री. कृष्णराज ह्यांची तक्रार आहे. जेथें नियंत्रण कमी अधिक प्रमाणांत यशस्वी रीतीनें चालू आहे अशा क्षेत्रांस स्वस्त कापड मिळत नाहीं आणि तें नियंत्रणाचा अभाव असलेल्या बाजारांत जातें असें त्यांचें म्हणणें आहे. कापडाची वाटणी देशभर आतां पूर्वीपेक्षा अधिक समाधानकारक असल्याविषयीं माहिती त्यांनीं दिली. नियंत्रण अधिक कडक करून जनतेची कापडाची गरज योग्य तऱ्हेनें भागवण्यांत यावी अशी त्यांनीं सूचना केली असून ह्या कामीं गिरण्यांचे मालक हार्दिक सहाय देतील असें अभिवचन दिलें आहे. उंची जातींच्या कापडास असलेली मागणी आज पुरवतां येत नसली तरी सामान्य जनतेस लागणाऱ्या मालाचें उत्पादन पुरेसें आहे आणि तें स्वस्त झालें आहे व होत आहे हा श्री. कृष्णराज ह्यांच्या निवेदनाचा सारांश आहे.

## १९४३ चें हिंदी विमा वार्षिक

१९४३ चें हिंदी विमा वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे, त्याच्या फक्त ४,००० च प्रती छापण्यांत आल्या आहेत. प्रतींचा तुटवडा पडला, तर ज्याचेजवळ प्रत असेल त्यानें दुसऱ्याची सोय पहावी, अशी सूचना विमा वार्षिकांत देण्यांत आली आहे.

* * *

विमा कायद्यान्वयें नोंदलेल्या ३१४ कंपन्यांपैकी २२० कंपन्या हिंदुस्थानांत स्थापन झालेल्या आहेत. ह्या २२० कंपन्यांपैकी ८४ कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या मुंबई प्रांतांत, ५१ बंगालमध्यें, ३५ मद्रास प्रांतांत, १७ पंजाबांत व ११ दिल्लीमध्यें आहेत. एकूण ९२ विदेशी कंपन्यांपैकी ८२ कंपन्या ग्रेट ब्रिटन किंवा ब्रिटिश वसाहती ह्यांतील आहेत.

* * *

हिंदी कंपन्यांपैकी १५५ कंपन्या फक्त आयुर्विम्याचें काम करतात. ३१ कंपन्या फक्त इतर विमे स्वीकारतात. ३४ कंपन्या आयुष्याचे व इतर विमे घेतात. ९२ विदेशी कंपन्यांपैकी फक्त ५ कंपन्या केवळ आयुर्विम्याचें काम करतात व ७६ कंपन्या फक्त इतर प्रकारचेच विमे स्वीकारतात.

* * *

१९४१ च्या वार्षिकापेक्षां हें वार्षिक चार महिने लवकर चालू वर्षी प्रसिद्ध झालें आहे. ३१ डिसेंबर, १९४३ रोजीं हातीं आलेल्या माहितीवरून १९४२ चें वार्षिक तयार करण्यांत आलें. पूर्वीप्रमाणें एप्रिल, मे पर्यंत वाट पाहिली नाहीं. विमा कंपन्यांनीं वर्ष संपल्यानंतरच्या जून अखेर तक्ते व माहिती पाठविली तर विमा वार्षिक अधिक लवकर प्रसिद्ध होऊं शकेल. १९४२ संबंधीं माहिती वेळेवर पाठविली नाहीं म्हणून १९४३ सालीं विमा कायद्याच्या १०२ कलमानुसार २३ कंपन्यांना नोटिसा पाठवाव्या लागल्या.

* * *

हिंदी विमा कंपन्यांनीं आपल्या ९९३ कोटि रुपये जिंदगी-पैकी ५४ कोटि, १४ लक्ष रुपये सरकारी रोख्यांत गुंतविलेले आहेत. कंपन्यांनीं दिलेल्या सोड किंमतीच्या आंतील कर्जाची रकम ८ कोटि, ५९ लक्ष रुपये भरली. त्यांनीं ७ कोटि, ९३ लक्ष रुपयांचे हिंदी कंपन्यांचे भाग घेतलेले आहेत. म्युनिसिपल, पोर्ट ट्रस्ट, इंप्रूव्हमेंट ट्रस्ट, इत्यादींच्या रोख्यांत त्यांचे ६ कोटि, ७४ लक्ष रुपये आहेत आणि जमीन व मालमत्ता ह्यांत त्यांनीं ५ कोटि, ७७ लक्ष रुपये घातले आहेत.

* * *

हिंदी आयुर्विमा कंपन्यांच्या विमाफंडांवर पडणारा व्याजाचा दर व व्यवस्थेच्या एकूण खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं पडणारें प्रमाण हीं उतरत चाललीं आहेत, हें खालील तक्ता दर्शवितो. उतरतें खर्चाचें प्रमाण ही अर्थातच समाधानाची बाब आहे.

| वर्ष | १९३८ | १९३९ | १९४० | १९४१ | १९४२ |
|---|---|---|---|---|---|
| द. सा. द. शे. व्याज | ५·१५ | ४·६८ | ४·३७ | ४.१७ | ३·९४ |
| खर्चाचें प्रमाण | ३१·७ | ३३·२ | २८·९ | २७·४ | २७·७ |

* * *

नवीन आयुर्विमा कंपन्या काढणारांना व आयुर्विमा कंपनीच्या कामास आगीचा व इतर विमे ह्यांची जोड देऊं पहाणारांना सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सनें सावधगिरीची सूचना दिली आहे. १९३३ सालीं हिंदुस्थानांत ३३ कोटि रुपयांचे नवे विमे कंपन्यांनीं स्वीकारले; १९४२ सालीं हा आकडा ४३ कोटि रुपये झाला. १९४३ सालीं ह्यापेक्षा पुष्कळ जास्त काम झालें असलें तरी नव्या कंपन्यांच्या स्थापनेचे प्रमाणांत विम्याचें काम वाढत चाललेलें नाहीं.

* * *

विमे रद्द होण्याचें भारी प्रमाण, हें भरमसाट रिन्युअल खर्चाच्या भारी प्रमाणाचें मुख्य कारण असतें. पांच जुन्या कंपन्या व पांच नव्या कंपन्या ह्यांनीं १९३८ सालीं स्वीकारलेल्या विम्यापैकी किती टक्के विमे १९४० अखेर २३ वर्षांत लॅप्स झाले, हें पाहिलें, तर पहिल्या गटांतील कंपन्यांचें २९·१६% काम रद्द झालें व दुसऱ्या गटांतील कंपन्यांचें ५३·९३% काम रद्द झालें, असें आढळून आलें. एका पुऱ्या वर्षाचा हप्ता कंपनीकडे दाखल होण्यापूर्वीच पॉलिसी लॅप्स झाली आणि कित्येक कंपन्यांचा पॉलिसीवरील खर्चच पहिल्या वर्षाच्या हप्त्यापेक्षा जास्त असतो हें लक्षांत घेतलें, तर कंपन्या किफायतशीर कशा चालणार ?

* * *

मलाया, ब्रह्मदेश, वगैरे शत्रुव्याप्त देशांत अडकलेल्या विमेदारांस, युद्धकैद्यांस व निर्वासितांस कित्येक कंपन्यांनीं सवलती दिल्या आहेत व विशेषतः एका कंपनीनें तर फारच सढळ हातानें त्यांस सवलती दिलेल्या आहेत, त्यांचा उल्लेख विमा-वार्षिकांत करण्यांत आलेला आहे.

* * *

हिंदुस्थानांत ॲक्चुअरीचें काम करणारे एकूण १४ फेलोज व २९ असोसिएट्स आहेत. फेलोजमध्यें श्री. जी. एस. दिवाण व श्री. एस. एन. वैद्य हीं महाराष्ट्रीय नांवें आढळतात. त्यांपैकी श्री. दिवाण हे मुंबईस सरकारी सिडनहॅम व्यापारी कॉलेजांत प्रोफेसर असून ॲक्चुअरीचेंहि काम करतात व श्री. वैद्य हे ओरिएंटल कंपनींत आहेत. ( असोसिएटसच्या व्यवसायावर सरकारनें आतां बंधनें घातलीं असून त्यांना पूर्वीप्रमाणें मोकळेपणानें धंदा करतां येणें अशक्य झालें आहे. )

* * *

# स्फुट विचार

## संरक्षक व संवर्धक अन्नाचें महत्त्व

हिंदुस्थानांत अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचा विचार करतांना अधिकारी वर्ग व कांहीं पुढारीहि मुख्यतः धान्याकडेच लक्ष देतात. दूध व त्याचे पदार्थ, भाजीपाला, फळें, अंडीं, मासे, मांस इत्यादि संरक्षक व संवर्धक अन्नाकडे दुर्लक्ष केलें जातें. वास्तविक पहातां मनुष्यामध्यें रोगप्रतिबंधक शक्ति आणण्यास व त्यांची ताकद राखण्यास त्यांचाच उपयोग जास्त होतो. त्याचप्रमाणें शरीराच्या वाढीसहि त्यांची आवश्यकता असते. अशा खाद्य पदार्थांचें एकूण अन्नांतील महत्त्व निदर्शनास आणण्यासाठी मुंबईच्या पीपल्स प्रॉव्हिन्शिअल फूड कौन्सिलनें एक चोपडें तयार केलें आहे, तें पद्म पब्लिकेशन्स लि. मुंबई, ह्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. ( " Protective Foods ". पृ. सं. १८ किं. ८ आणे. ) ग्रेटब्रिटनमध्यें युद्धास प्रारंभ झाल्यापासूनच अन्नपुरवठा नियंत्रित केला आहे, व धान्य ठराविक किंमतीस विकण्यांत येतें, परंतु त्याचें रेशनिंग नाहीं. संरक्षक व संवर्धक अन्नांचें मात्र तेथें रेशनिंग आहे. हिंदुस्थानांतील मजूरवर्ग आज बहुंशीं धान्यावरच जगतो, म्हणून हिंदी लोकांना धान्याचें रेशनिंग झालें म्हणजे पुरे, अशी समजूत होण्याचा संभव आहे मुंबई प्रांतांतील कामगारांच्या मानानें पंजाबी कामगारांस पुष्कळच सकस अन्न खावयास मिळतें व त्यांची वाढ आणि त्यांचा उत्साहहि इंग्रजांच्या तोडीचा असतो. आपल्या इकडे धान्यापलीकडे अन्नाचा विचारच होऊं शकत नाहीं, ही परिस्थिति पालटली पाहिजे व त्यासंबंधांत प्रचार झाला पाहिजे. शेतकरी, कामगार व मध्यमवर्गीय लोक ह्यांना केवळ धान्यावरच निर्वाह करावा लागतो, ह्याचें कारण त्यांचें दारिद्र्य व संवर्धक अन्नांची महागाई, हें होय. गेलीं पन्नास वर्षें त्यांच्या अन्नाच्या कसदारपणांत हळु हळु बिघाड होत आहे व चालू युद्धामुळें ही परिस्थिति तीव्रतेनें डोळ्यांत भरूं लागली आहे आणि लोकांचा दमदारपणा कमी होत असलेला उघड दिसूं लागला आहे. औद्योगिक क्रांतीच्या प्रारंभींचे काळांत इंग्लंडमध्येंहि शेतकरी व कामगार ह्यांवर असाच परिणाम झाला, परंतु तेथील त्या वेळच्या सरकारनें योग्य उपाययोजना करून बदललेल्या परिस्थित्यनुसार व्यवस्था करवली.

---

## हिंदी अन्नाची सत्वहीनता

संरक्षक व संवर्धक अन्नाचें महत्त्व वर्णून " प्रोटेक्टिव्ह फूड " ह्या चोपड्यांत भाजीपाला, फळें, अंडीं, मासे, इत्यादींविषयीं विचार केलेला आहे. हिंदी कामगारांस लागणाऱ्या कॅलरी उष्णतेपैकी ९०% त्यांस धान्य व साखर ह्यांपासून मिळतात आणि ५% तेलांपासून व ५% संरक्षक अन्नापासून मिळतात. ब्रिटिश कामगारांचे तत्सम आकडे अनुक्रमें ६०%, १८% व २२% असे आहेत. ह्यावरून हिंदी जनतेच्या अन्नाची सत्वहीनता लक्षांत येईल. शाकाहारी माणसानें दररोज निदान १२ औंस दूध व १ औंस लोणी अथवा तूप घेतलें पाहिजे. शक्य झालें तर शेतकऱ्यांनीं व कामगारांनीं अर्ध्या शेरापेक्षा जास्त धान्य दररोज खाऊं नये; बाकीचा आहार संरक्षक अन्नाचा असावा. संयुक्त राष्ट्रांची हॉटस्प्रिंग्ज येथें मे-जून १९४३ मध्यें परिषद झाली, तिनें संरक्षक अन्नांच्या उत्पादनासंबंधी ठराव केला त्यावर हिंदुस्थान सरकारच्या प्रतिनिधींनीं सही केली आहे. ह्या ठरावांची अंमल बजावणी सुरू होणें उचित नव्हे काय ! वरीलप्रमाणें विवेचन केल्यानंतर, चोपड्यांत अशा अन्नाचें उत्पादन व त्याची वाटणी ह्यांविषयीं विधायक सूचना करण्यांत आल्या आहेत. लोकांना स्वतः यासंबंधांत बरेंच कार्य करतां येईल व त्यांनीं सरकारच्या " अधिक धान्य पिकवा " मोहिमेनुसार मिळणाऱ्या सवलती व आर्थिक मदत ह्यांचा फायदा घेणें जरूर आहे. एका दृष्टीनें सध्याची युद्ध परिस्थिति ह्या योजनांच्या पुरस्कारास विशेष सोईची आहे, कारण ज्या गोष्टी युद्धकालांत सत्वर होऊं शकतात, त्याच घडवून आणण्यास शांततेच्या वेळीं फार वेळ लागतो. सहकारी संघटना ह्याबाबत विशेष सोईची व प्रभावी ठरण्याजोगी आहे. प्रत्यक्ष कार्याची आखणी व उभारणी करणें अवघड असलें तरी प्रश्नाचें महत्त्व लक्षांत घेऊन सरकारनें त्यांत विशेष जिव्हाळ्यानें लक्ष घातलें पाहिजे व लोकांनींहि आपण होऊन संघटित प्रयत्न केले पाहिजेत.

---

## स्टर्लिंग शिलकांचें सत्यस्वरूप

युद्धापूर्वी लंडन हें आंतरराष्ट्रीय देवघेवींच्या व्यवहाराचें फार मोठें केंद्र होतें आणि राष्ट्रांच्या देण्याघेण्याची वजावाट त्याच्या मार्फत होत असे. पौंड स्टर्लिंगला जगाच्या बाजारांत प्रचंड महत्व होतें आणि लंडनवरील हुंडीस जबर मागणी असे. बहुतेक राष्ट्रें लंडनच्या मार्गानें आपलीं परदेशीय देणीं देऊन टाकण्यास सोईचें पडावें म्हणून स्वतःचा कांहीं पैसा त्या ठिकाणीं नेहमीं शिल्लक ठेवीत असत. प्रस्तुत युद्धाच्या परिस्थितींत इंग्लंडला बाहेरून यावयाच्या येण्यापेक्षां इतर देशांचें देणेंच अधिक झाल्यानें ह्या देशांच्या शिलका लंडनमध्यें तुंबल्या आहेत. इंग्लंडला दुसऱ्या देशांस माल किंवा भांडवल पुरवणें युद्ध कार्यामुळें अशक्य झालें आहे आणि त्यास परदेशांचा माल घेतल्यानें इतरांचें देणेंच झालें आहे. ह्या देण्यांतला कांहीं भाग इंग्लंडनें आपली परदेशांतली भांडवलाची गुंतवण कमी करून म्हणजे तेथील रोखे विकून फेडला आहे, पण बरेंचसें देणें दुसऱ्या देशांच्या लंडनमधील बाकयांच्या स्वरूपांत वाढलें आहे. निरनिराळ्या देशांच्या स्टर्लिंगमधील शिलकांचे आकडे खालीं दिले आहेत ते बोधप्रद होतील:—

| कोणाची शिल्लक बाकी | वर्ष व महिना | दशलक्ष पौंड स्टर्लिंग |
|---|---|---|
| हिंदुस्थान | एप्रिल, १९४४ | ७२१ |
| आयर्लंड | डिसेंबर, १९४३ | १३२ |
| कॅनडा | ............ | १५७ |
| मलाया | जुलै, १९४१ | ५८ |
| ऑस्ट्रेलिया | जानेवारी, १९४४ | ७४ |
| न्यूझीलंड | नोव्हेंबर, १९४३ | ३१ |
| आर्जेंटिना | डिसेंबर, १९४३ | ४२ |
| इजिप्त | डिसेंबर, १९४३ | ९५ |
| वसाहती | मार्च, १९४३ | ४५ |
| दक्षिण आफ्रिका | एप्रिल, १९४४ | १४ |
| | एकूण | १,३७५ |

इंग्लंडनें गेल्या चार वर्षांत दुसऱ्या देशांचें कर्ज फेडण्यासाठी स्वतःच्या मालकीचे परदेशांतील रोखे, सोनें, मालमत्ता इत्यादि विकून टाकली व नवें कर्ज केलें, त्या सर्वांची एकूण बेरीज २,८४३ दश लक्ष पौंड भरते. ह्यावरून इंग्लंडच्या प्रचंड युद्धखर्चाची कल्पना येते. तसेंच, वर दिलेल्या आकड्यांवरून हिंदुस्थाननें इतर देशांच्या मानानें स्वतः झीज सोसून युद्धखर्चास किती मोठ्या प्रमाणांत सहाय दिलें आहे हें स्पष्ट दिसून येतें. लंडनमधील स्टर्लिंग शिलका म्हणजे हिंदुस्थाननें युद्ध व्यवहारांत मिळवलेला नफा नव्हे. स्वतःच्या पोटास चिमटा लावून ह्या देशानें इंग्लंडला युद्धखर्चासाठी शेकडो कोटि रुपये गरजेच्या प्रसंगीं पुरवले त्याचा हा परिणाम आहे हें जितकें स्पष्टपणानें सर्वांच्या लक्षांत येईल तितकें तें अगत्याचें आहे.

---

## सोनारानें कान टोचले

जागतिक चलन परिषदेमध्यें हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं केलेल्या सर्व सूचना फेटाळल्या गेल्यामुळें त्यांची निराशा होऊन आपण तिच्या चर्चेतून अंग काढून घ्यावें असें त्यांस वाटलें असल्यास त्यांत नवल नाहीं. जागतिक चलननिधी निर्माण व्हावयाचा आहे, त्यांतला मोठा हिस्सा हिंदुस्थानास उचलावा लागेल पण ह्या निधीच्या व्यवस्थेवर देखरेख करण्यासाठीं कार्यकारी मंडळ नेमण्यांत येईल त्यांत मात्र ह्या देशास कायमच्या हक्काचें स्थान मिळणार नाहीं असें ठरल्यानें हिंदी प्रतिनिधींची निराशा बळावणें स्वाभाविक आहे. "शेळी जाते जिवानिशी आणि खाणार म्हणतो वातड्शी" ह्या न्यायानें लॉर्ड केन्स ह्यांनीं हिंदुस्थान युद्ध परिस्थितीमुळें गब्बर झाला असल्याचे उद्गार काढले, त्यांचा निषेध सर जेरेमी रायस्मन ह्यांस करावा लागून ह्या देशानें युद्धप्रयत्नांत केलेल्या स्वार्थत्यागाविषयीं खुलासा करणें आवश्यक झालें. ह्यावरून हिंदुस्थानच्या जिव्हाळ्याच्या आर्थिक हितसंबंधांची वासलात जागतिक चलन परिषदेंत कशी लागली ह्याची कल्पना येण्यासारखी आहे. हिंदुस्थानचें स्टर्लिंग लंडनमध्यें एवढ्या मोठ्या प्रमाणांत साठलें आहे कीं ह्याची फेड ह्या देशाच्या मागणीस अनुसरून नव्हे तर इंग्लंडच्या सवडीस धरूनच करणें व्यवहार्य आहे असा युक्तिवाद केला जात आहे आणि जागतिक चलननिधींतून वरील फेड होण्याइतकें त्यांत सामर्थ्य नसल्यानेंहि हिंदी प्रतिनिधींची सूचना मान्य होणें शक्य नाहीं असेंहि सांगण्यांत आलें आहे. आमचें स्टर्लिंगमधलें सर्व देणें तात्काळ परत करा किंवा त्याचें रूपांतर डॉलर्समध्यें करा आणि हा सर्व व्यवहार जागतिक गंगाजळींमधून पुरा करा अशी आत्यंतिक स्वरूपाची मागणी हिंदुस्थाननें केलेली नाहीं. युद्धोत्तर आर्थिक पुनर्घटनेस सहायक होईल अशा पद्धतीनें हिंदुस्थानास आपल्या स्टर्लिंग शिलकांचा पैसा परत मिळावा आणि ही सर्व शिलक स्टर्लिंगमध्यें गुंतलेली न रहातां डॉलर्समध्यें तिचा बराचसा भाग असावा म्हणजे अमेरिका वगैरे देशांकडून आपणांस माल सोइस्कर रीतीनें आणतां येईल ह्या हिंदी सूचनेंत वावगें काय आहे ? तिला सर जेरेमी रायस्मन ह्यांनीं पाठिंबा दिला आहे हें येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. इंग्लंडला त्याच्या जबर युद्धखर्चामुळें इतर देशांचें देणें झालें आहे हें जितकें खरें आहे, तितकेंच खरें हें आहे कीं हिंदुस्थाननें महर्गतेच्या व अन्न टंचाईच्या आपत्ती सोसल्यानें ह्या देशांतील लोकांचे पैसे लंडनमध्यें स्टर्लिंग चलनांत गुंतून पडले आहेत. युद्ध संपल्यावर हिंदी लोकांस त्यांच्या स्वतःच्या गरजेप्रमाणें त्या शिलका परत मिळाव्या असें म्हणणें न्यायाचें व सरळ नीतीचें नाहीं काय ? हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांनींच स्वतः ह्या देशाची बाजू नीट व स्पष्ट पणें मांडली आहे हें चांगलें झालें.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

## पुणें शहर

**मांडवल :**

( ता. ३१-५-४४ रोजीं )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत व खपलेलें | : | रु. १०,००,००० |
| वसूल झालेलें | : | रु. ५,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | : | रु. १,०८,००० |
| एकूण खेळतें मांडवल | : | रु. ७५,००,००० चे वर |

—: डायरेक्टर्स :—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन,
श्री. वा. पु. वर्दे, प्रो. वा. गो. काळे, श्री. न. ग. पवार,
श्री. श्री. गो. मराठे, श्री. त्रिं. वि. रानडे, श्री. र. चिं. सोहनी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. रा. जोशी,
श्री. म. वि. गोखले, श्री. वि. ह. देशमूख

: शाखा :

पुणें ४, दलाल स्ट्रीट, मुंबई, जळगांव, नागपूर.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सी. व्ही. जोग
मॅनेजर

---

# दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल ... ... ... | रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें मांडवल ... ... ... | रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. | १,२३,००,००० |

मुख्य कचेरी: ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

मुंबईमधील शाखा : बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

इतर शाखा : अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर, कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज ( कच्छ ).

लंडन एजन्ट्स : वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

डायरेक्टर्स : सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस, सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई., मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षां कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंट:—एच्. ए. करीमभाई

## आजचा जपान

### काळाबाजार–रेशनिंग–युद्धप्रचार–अमेरिकेशी शत्रुत्व–नाइलाजाचें युद्ध.

जपानमध्येंहि काळाबाजार आहे. " आमच्या नोकरांना काळ्या बाजाराची माहिती नसती, तर आम्हांला मेजवान्यांसाठी जादा अन्न मिळूं शकलें नसतें" असें कित्येक प्रमुख जपानी लोक म्हणाले. परदेशी व्हिस्कीला कित्येक वर्षें बंदी असली, तरी हॉटेलांत एखादा जपानी खिशांतून "जॉनी वॉकरची" अथवा "ब्लॅक अॅण्ड व्हाइट"ची बाटली काढतांना दिसतो. खाण्याचा जवळजवळ प्रत्येक पदार्थ रेशन केलेला आहे. लोकांच्या आवडी किंवा इच्छा ह्यांवर रेशनचें प्रमाण अवलंबून ठेवलेलं नसून तें शरीराच्या गरजांवर आधारलेलें आहे. औषधें दुर्मिळ आहेत व अर्भकें, बाळंतिणि स्त्रिया व आजारी लोक ह्यांसच दूध मिळतें; आघाडीवरील सैनिकांनाच अंडीं व कोंबड्या मिळतात. दर माणशीं दरमहा पावशेर साखर दिली जाते. कोणासच अगदीं पोटभर खाद्य मिळत नाहीं. अन्न कमी पडून अॅनिमिया होऊं नये, एवढ्या बेतानें रेशन ठरवून बाकी सर्व अन्न युद्ध दीर्घकाळ टिकेल ह्या बेतानें साठवून ठेवण्याचें जपानी वैद्यकीय पुढाऱ्यांचें धोरण असण्याचा संभव आहे. साबण, आगपेट्या कोळसा, ह्यांचा तुटवडा भासतो. कपड्यांचें रेशनिंग अगदीं कडक आहे. खासगी वापरासाठी पेट्रोल मिळत नाहीं. ट्रामगाड्या व आगगाड्या अगदीं भरून जातात. लोखंड वगैरे धातूंचीं फाटकें, घंटा, स्टोव्ह, इत्यादि सर्व अदृश्य झालीं आहेत. बादशहावर व राष्ट्राच्या अंगीकृत कार्यावर निष्ठा हीं सामान्य माणसाचे अंगीं पूर्णपणें बाणलेलीं आहेत. करमणुकीस बंदी आहे. प्रत्येक जपानी मनुष्य जणूं काय त्याचे एकट्यावरच युद्ध जिंकण्याची सबंद जबाबदारी आहे, अशा भावनेनें वागत असल्याचें दिसतें. पूर्वीची जपानी प्रचारांतील ऐट आतां नाहींशी होऊन, आपले शत्रू जवळ येत चालले आहेत, सध्याचा क्षण जपानी साम्राज्याच्या दीर्घ इतिहासांतील अत्यंत गंभीर असा आहे, वगैरे सांगून प्रचारानें वेगळें स्वरूप धारण केलें आहे.

युद्धास प्रारंभ करण्याची जबाबदारी सर्वस्वी दोस्त राष्ट्रांवर आहे, असें जपानी लोकांना सांगण्यांत येतें. अमेरिका व जपान ह्यांचेमध्यें ऐतिहासिक मित्रत्व जपान्यांना कोठेंच आढळत नाहीं, परंतु अमेरिकेविरुद्ध त्यांचीं गाऱ्हाणीं मात्र अनेक आहेत. अमेरिकेंत जपान्यांना प्रवेश देतांना भेदाभेदाची वागणूक, १९२१-२२ मधील वॉशिंग्टन परिषदेंतील खटका, मँच्युरियासंबंधांत विरोध, आर्थिक युद्ध व लष्करी गळचेपी, ह्या जपान्यांच्या अमेरिकेविरुद्ध कांहीं प्रमुख तक्रारी आहेत. १९४१ मधील वाटाघाटींत अमेरिकेचें धोरण सच्चेपणाचें नव्हतें, जर्मनीविरुद्ध लढण्यास ग्रेटब्रिटनला मदत करण्यासाठी वेळ काढण्याकरितां जपानशीं दिरंगाईचें धोरण त्यानें अंगिकारलें, जपानचा उपमर्द केला, वगैरे गोष्टींचा प्रचार करून पर्ल बंदरावर हल्ला करण्याखेरीज जपानला गत्यंतरच नव्हतें, असें जपान्यांना भासविण्यांत येतें. पर्ल बंदराचा हल्ला हा युद्धाचा प्रारंभ नसून आर्थिक युद्धाचें तें लष्करी युद्धांत रूपांतर आहे, आणि जपानचा शेवटीं पुरा पराभव झाला तरी ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें अंगिकारलेलें धोरण हेंच बरोबर होतें, जपानला दुसरें गत्यंतरच नव्हतें, अशीच तेथील सामान्य जनतेची भावना होईल. जपानी सरकारच्या प्रचाराचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. राजकीय दृष्ट्या पाहिलें, तर मुख्य प्रधान टोजो व त्याचे साथीदार ह्यांचे हातीं सर्व सत्ता केंद्रीभूत झालेली आहे. मंत्रिमंडळांत, मंत्रिमंडळाबाहेर, जपान देशांत, कोरियांत, चीनमध्यें, इतर पादाक्रांत देशांत, सगळीकडे लष्करी शक्तीच्या उपासकांचें प्राधान्य आहे. बादशहाचे नांवानें हुकूम सोडणाऱ्या कोणाचेंहि डोळे मिटून ऐकण्याची जपान्यांची प्रवृत्ति आहे. होणाऱ्या पराभवाची पुढाऱ्यांस जाणीव असली, तरी सामान्य जनतेंत अंतिम विजयाबद्दल विश्वास निर्माण करण्यांत येतो. शरण येण्यापेक्षां मरण पत्करण्याचा त्यांचा कल आहे.

---

### बँक ऑफ इंडिया लि.

| | रु. | आ. | पै |
|---|---|---|---|
| १९४३ च्या पहिल्या सहामाहीचा नफा | ३५,८३,१८९ | ९ | १ |
| त्यांतून इन्कम टॅक्स, सुपर टॅक्स व एक्सेस प्रॉफिट टॅक्स वजा | १६,५०,००० | ० | ० |
| उरलेला निवळ नफा | १९,३८,१८९ | ९ | १ |
| मागील हिशेबांतील शिलकी नफा | ९,८५,८२७ | ४ | ५ |
| एकूण | २९,१९,०१६ | १३ | ६ |

बँकेचें भरणा झालेलें भांडवल १ कोटि रुपये आहे. त्यावर द. सा. द. शे. ११% (प्रत्येक भागास २ रु. १२ आ.) करमाफ इंटेरिम डिव्हिडंड देण्याचें बँकेच्या डायरेक्टर बोर्डानें ठरविलें आहे. त्यास ५,५०,००० रुपये लागतील. उरलेली २३,८९,०१६ रु, १३ आ. ६ पै ही रकम पुढील हिशेबांत ओढण्यांत येईल.

### लिमिटेड कंपनीचा दिवाळखोर डायरेक्टर

केशवजी मुळजी जेठा ह्यांस त्यांच्या स्वतःच्याच अर्जावरून ता. २९ एप्रिल, १९४३ रोजीं दिवाळखोर ठारविण्यांत आलें होतें व त्यांस रीतसर डिसचार्ज मिळण्यापूर्वीच त्यांनीं न्यू कमर्शिअल बँक ऑफ इंडिया लि. चे डायरेक्टर म्हणून कांहीं व्यवहार केले. कोर्टानें दिवाळखोर ठरविलेल्या इसमास कंपनी कायद्याप्रमाणें लिमिटेड कंपनीचा डायरेक्टर रहातां येत नाहीं, म्हणून केशवजींना मुंबईच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनें १ दिवसाच्या साध्या कैदेची व २५० रुपये दंडाची शिक्षा दिली होती, ती मुंबई हायकोर्टास अपुरी वाटून त्यानें शिक्षा वाढवून ३ महिन्यांचा कारागृहवास सांगितला. मॅजिस्ट्रेटनें गुन्ह्याच्या स्वरूपाचा गंभीरपणा लक्षांत घेतला नाहीं, ह्या मुद्यावर सरकारनें त्याच्या निकालावर अपील केलें होतें, त्याचा परिणाम वरीलप्रमाणें झाला.

### कापडाचे निर्गतीवर ३% जकात

हिंदुस्थानांतून निर्गत होणारें कापड व सूत ह्यांवर ३% कस्टम्स ड्यूटी बसविण्यांत आली आहे, तिच्या उत्पन्नांतून "कॉटन टेक्स्टाइल फंड" निर्माण करण्यांत यावयाचा आहे. हिंदी कापड व सूत ह्यांचा परदेशी खप वाढविणें, ह्या धंद्यासंबंधीं शास्त्रीय शिक्षण व संशोधन ह्यांची व्यवस्था करणें, वगैरे दृष्टीनें फंडाचा विनियोग करण्यासाठी सरकार एक समिति नेमणार आहे.

### चांगल्या कापडाचा पुरवठा

चांगल्या दर्जाच्या तलम कापडाचा तुटवडा अंशतः दूर करण्यासाठी मुंबई शहर व उपनगरें ह्यांत असलें कांहीं प्रकारचें कापड उपलब्ध करून देण्यांत येत आहे.

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या कि. आठ रु. गाजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

मट कं. सांगली, S. M. C.

मट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

पुण्यांतील

## आदर्श निवासस्थान व भोजनालय

## छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

सध्यांच्या टंचाईच्या काळांत जीवनद्रव्यें कमी पडतात.

जीवनद्रव्यांनीं ( Vitamins ) युक्त असे

( सल्लाग खात्यानें मान्यता दिलेले )

## टोमॅटो केचप ( गोड ) व

## टोमॅटो सॉस [ तिखट व आंबट ]

आजच मागवा व जीवनद्रव्यांची वाटणारी उणीव भरून काढा.

**रुरल प्रॉडक्टस कंपनी लि. पुणें**

बिझिनेस ऑफिस: ९११ अ सदाशिव, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

## मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —

## दि औंध म्यूच्युअल लाइफ अॅश्युरन्स सोसायटी लि., पुणें.

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना: १९१९ )

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—

सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा: मोति माणिक मॅन्शन, लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस: मेहता हाऊस, अपोलो स्ट्रीट, मुंबई.

स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

गिरगांव मुंबई नं. ४

बुधवार चौक, पुणें


हें पत्र पुणें, पेठ मांवुर्डी घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' मांवुर्डी, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.